IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 2, January 2026
Impact Factor: 7.67

# शैशावस्थातील भावनिक विकास : सांख्यिकीय माहितीवर आधारित संशोधनात्मक अभ्यास

सुवर्णा निळकंठ चोपडे

मुख्याध्यापिका

एस. बी. वझे इंग्लिश मीडियम स्कूल, मानपाडा, डोंबिवली (पूर्व), महाराष्ट्र

**सारांश**

शैशावस्था (जन्म ते दोन वर्षे) ही मानवी जीवनातील भावनिक विकासाची अत्यंत मूलभूत अवस्था आहे. या टप्प्यात निर्माण होणाऱ्या भावनिक प्रतिक्रिया, संलग्नता, भावनांचे नियमन व सामाजिक प्रतिसाद यांचा पुढील आयुष्यातील व्यक्तिमत्त्व, मानसिक स्वास्थ्य व सामाजिक जुळवणुकीवर खोल परिणाम होतो. प्रस्तुत संशोधनात्मक लेखात शैशावस्थेतील भावनिक विकासाची सैद्धांतिक मांडणी, विविध टप्पे, परिणामकारक घटक यांसोबतच भारत व जागतिक[1] स्तरावरील उपलब्ध सांख्यिकीय माहितीचा अभ्यास करण्यात आला आहे. संयुक्त[2] राष्ट्र बालनिधी, जागतिक आरोग्य संघटना, राष्ट्रीय[3] कुटुंब आरोग्य सर्वेक्षण तसेच विविध मानसशास्त्रीय संशोधनांतील आकडेवारीच्या आधारे भावनिक विकासाशी निगडित घटकांचे विश्लेषण करण्यात आले आहे. हा लेख शिक्षणशास्त्र, बालमानसशास्त्र व समाजकार्य क्षेत्रासाठी उपयुक्त ठरेल.

**कीवर्ड्स :** शैशावस्था, भावनिक विकास, संलग्नता, सांख्यिकीय अभ्यास, बालमानसशास्त्र

[1] जागतिक आरोग्य संघटना (2020). *बालमानसिक आरोग्य व प्रारंभिक बालविकास अहवाल.*

[2] संयुक्त राष्ट्र बालनिधी (2021). *प्रारंभिक बालविकास अहवाल.*

[3] राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण – पाचवा अहवाल (2019–21), भारत.